जा.क्र./पो.निरी./सासुवि./        /२०१८
सा.सु.विभाग,गुन्हे शाखा यांचे कार्यालय,
दि. २२/०८/२०१८

प्रति,

मा.सर्व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी / संचालक,
पुणे विभाग

**विषय** :- आपले प्रसार माध्यमाचे बातम्या मध्ये फरासखाना पो स्टे गुरनं.१८३/२०१८,भादविक ४१९,४२०,३४ अन्वये दाखल झालेल्या गुन्हयामध्ये फिर्यादी महिला यांचे नाव नमुद न करण्याबाबत.......

**संदर्भ** :- जा.क्र.६०२३/२०१८,फरासखाना पो स्टे पुणे शहर ,दि.२१/०८/२०१८

---

महोदय,

वरील विषया व संदर्भान्वये आपणास विनंती करण्यात येते की,फरासखाना पो स्टे गुरनं. १८३/२०१८,भादविक ४१९,४२०,३४,सह माहिती तत्रज्ञान का.क.६६(डी)६६(सी) मधील अज्ञात चार मोबाईल व ई-मेलधारकांनी फिर्यादी यांना वेळोवेळी दि.११/०४/२०१८ ते दि.२९/०५/२०१८ पर्यंतचे कालावधी मध्ये ई-मेल व फोन करुन फिर्यादीस १ कोटी ७० लाख रूपये रकमेचे बक्षिस / लॉटरी लागली आहे असे सांगुन,सदर बक्षिस / लॉटरीची रक्कम देण्याचे अमिष दाखवुन,ती रक्कम देण्यासाठी फिर्यादी यांना वेगवेगळी खोटी कारणे सांगुन,त्या कारणांवरून सदर इसमांचे वेग-वेगळया खात्यावर एकुण १६,३२,०००/- रुपये भरावयास लावुन फिर्यादी यांना कोणत्याही बक्षीसाची अगर लॉटरीची रक्कम न देता त्यांची फसवणुक केली आहे. असलेबाबत फरासखाना पो स्टे येथे दि.०३/०८/२०१८ रोजी वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर दि.०४/०८/२०१८ रोजीचे दैनिक वर्तमान पत्रामध्ये वरील बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या बातमीमध्ये फिर्यादी महिला यांचे नाव नमुद करण्यात आले होते. त्यामुळे फिर्यादी यांना मनस्ताप झाल्याचे संबंधीत पो स्टे चे संबंधीत अधिकारी यांना समक्ष येवन तसेच फोनवर कळविले आहे.

तरी यापुढे वरील गुन्ह्यासंदर्भात दैनिक वर्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या बातमी मध्ये फिर्यादी महिला यांचे नाव नमुद करण्यात येऊ नये ही विनंती आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,(सा.सु.विभाग)
तथा जनसंपर्क अधिकारी,गुन्हे शाखा पुणे शहर

प्रत माहितीस्तव,
पोलीस निरीक्षक,(गुन्हे)
फरासखाना पो स्टे पुणे शहर